936

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** नाशिक ग्रामीण  **P.S.(ठाणे):** निफाड
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0085  **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 08/03/2025 03:44

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** गुरूवार  **Date From (दिनांक पासून):** 06/03/2025
**Time Period (कालावधी):** पहर 6  **Date To ( दिनांक पर्यंत):** 06/03/2025
**Time From (वेळेपासून):** 17:11 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 17:42 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 08/03/2025  **Time (वेळ):** 03:24 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 006
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 08/03/2025 03:24 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 0.5 किमी  **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** उप अधीक्षक भुमी अभिलेख कार्याल,निफाड

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):
(a) Name (नाव): सचिन सुकदेव कुयटे
(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :
(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष): 1989
(d) Nationality (राष्ट्रीयत्व): भारत
(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):
(f) Passport No.(पारपत्र क्र.):
Date of Issue (दिल्याची तारीख):
Place of Issue (दिल्याचे ठिकाण):
(g) ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) Address (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | कोणार्क नगर, आडगाव,नाशिक,निफाड,नाशिक ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | मु पो दावचवाडी,निफाड,निफाड,नाशिक ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) Occupation (व्यवसाय):
(j) Phone number (फोन नं.):
Mobile (मोबाइल नं.): 91-9370342014

7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | नितेंद्र काशिनाथ गाढे | | | 1. गोसावी याचे शेजारी ,जुन्या सप्तश्रृंगी मंदिरा समोर,हनुमान नगर,निफाड,निफाड,निफाड, नाशिक ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 3,50,000/ रुपये ज्यात 500/ | 350,000.00 |

305 चे मोजणी व हद्दीखुणा बाबत विचारणा केली, त्यावेळी मी त्यांना सांगितले की, मी पाठपुरावा केला म्हणुन मावशीच्या जमीनीची मोजणी तर झाली आहे. परंतु हद्दीखुणा दाखविणे अजुन बाकी आहे. दिनांक 07/03/2025 रोजी शेतीच्या हद्दीखुणा दाखविल्या जातील अशी नोटीस मिळाली आहे. तेव्हा भुमी अभिलेख कार्यालयाचे शिपाई श्री. गाढे हे मला म्हणाले की, भुमी अभिलेख कार्यालयाचे उप अधीक्षक श्री. भाबड साहेब यांचेशी माझे चांगले संबंध आहे.मी भाबड साहेबांना बोलतो व तुमचे हद्दीखुणा दाखवुन व नकाशाचे शिट काढून काम पुर्ण करुन देतो. परंतु त्याच्या मोबदल्यात तुम्ही मला व भाबड साहेब यांना 4,00,000/- रुपये द्या असे बोलून माझेकडे 4,00,000/- रुपये लाचेची मागणी केली. त्यावेळी मी शिपाई गाढे यांना म्हणालो की, मावशी गरीब विधवा आहे तिच्या मागे पुढे कोणी नाही. आणि एव्हडे पैसे माझेकडे ही नाही. त्यावर शिपाई गाढे म्हणाले की,मला 4,00,000/-रुपये द्यावेच लागतील तरच दिनांक 07/03/2025 रोजी तुमच्या शेतीच्या हद्दीखुणा दाखविल्या जातील. नाहीतर तारीख जरी दिलेली असेल तरी हद्दीखुणा दाखविल्या जाणार नाही व नकाशाचे शिट बनवुन मिळणार नाही. माझ्या मावशीच्या शेतीच्या हद्दीखुणा दाखविण्याचे काम करुन घेणे गरजेचे असल्याने त्यावेळी मी त्यांना म्हणालो की माझे दाजी तसेच मावशीचे जावई श्री. बाबुराव झोमन यांचेकडून पैसे उसणे घेतो पण त्यांची परिस्थीती पण जेमतेम आहे. मी त्यांना घेवून तुमच्याकडे येतो. त्यावेळी तुम्ही त्यांना पण पैशाच्या बाबत बोला तेव्हा ते मला उसणे पैसे देतील. त्यावर ते मला ठीक आहे घेवुन ये त्यांना असे म्हणाले त्यानंतर मी तेथुन निघुन आलो.

दिनांक 06/03/2025 रोजी मी व माझे दाजी श्री. बाबुराव झोमन, यांना सोबत घेवून भुमी अभिलेख कार्यालय निफाड येथे शिपाई गाढे यांना मावशीच्या शेतीच्या कामाची बोलणी करण्यासाठी जाणार आहे. तेव्हा ते माझेकडे माझ्या मावशीच्या मौजे दिक्षी येथील गट नं. 305 च्या हद्दीखुणा दाखविण्याच्या व नकाशाचे शिट काढून देण्याच्या मोबदल्यात स्वतःसाठी उप अधीक्षक भुमी अभिलेख यांचे नावे 4,00,000/- रुपये लाचेची मागणी जरुर करतील मला शिपाई गाढे यांना लाच देण्याची ईच्छा नसल्याने त्यांच्यावर आपण कायदेशिर कारवाई करावी हि विनंती. असले बाबत सदर लोकसेवका विरुध्द ला.प्र. वि. नाशिक यांचेकडे दोन पंचासमक्ष तक्रार दिली होती.

मी दिलेल्या तक्रारी प्रमाणे लोकसेवक शिपाई गाढे, भुमी अभिलेख कार्यालय हे माझेकडे खरोखर लाचेची मागणी करतात अगर कसे? याची पडताळणी करणेकामी दिनांक 06/03/2025 रोजी पोलीस निरीक्षक श्रीमती आदमाने मॅडम व त्यांचे पथक असे हनुमान मंदिर कोठुर फाटा, निफाड येथे पोहचले मी व माझे दाजी श्री. बाबुराव झोमन असे मी माझे दुचाकीने तेथे पोहचून सापळा पथकाची भेट घेतली.

त्यानंतर पोलीस निरीक्षक श्रीमती आदमाने मॅडम यांनी मला, माझे दाजी श्री. बाबुराव झोमण व पंच क्र. 1 श्री. पवार अशांना शिपाई गाढे यांची भेट घ्यावी व त्यांच्याशी कामाच्या संदर्भात बोलणी करावी. तसेच त्यांनी उप अधीक्षक यांचे नाव घेवून लाचेची मागणी केल्यास त्यांची देखिल भेट घेवून पडताळणी करावी इत्यादी सापळा कारवाईच्या दृष्टीने आवश्यक सुचना देवुन पोहवा/पळशिकर यांनी माझेकडे व्हाईस रेकॉर्डर चालु करून देवुन लोकसेवक शिपाई श्री. गाढे, भुमी अभिलेख कार्यालय, निफाड यांचे भेटीसाठी भुमी अभिलेख कार्यालय, निफाड येथे 17.11 वाजेच्या सुमारास रवाना केले. त्याप्रमाणे मी, माझे दाजी श्री. झोमण व पंच श्री. पवार अशांनी लोकसेवक शिपाई गाढे यांची भुमी अभिलेख कार्यालयात जावून भेट घेतली असता त्यांनी संभाषणा दरम्यान ''सुरुवातीला 4,00,000/- रुपयांची स्वतःसाठी उप अधीक्षक भुमी अभिलेख यांचे नावे लाचेची मागणी केली व तडजोडीअंती 50,000/- रुपये कमी करून 3,50,000/-रुपये लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम आजच आणुन देणे बाबत सांगितले. सदर वेळी शिपाई गाढे यांनी उप अधीक्षक भाबड साहेब यांचे नावे स्वतःसाठी लाचेची रक्कम मागितल्याने मला दिलेल्या सुचने प्रमाणे मी शिपाई गाढे यांना उप अधीक्षक भाबड साहेब यांची भेट घेणे बाबत विनंती केली असता शिपाई गाढे यांनी त्यासाठी नकार देवून मला भाबड साहेबांची भेट घेवून पडताळणी करु दिली नाही.

त्यानंतर आम्ही तिघे तेथुन निघुन माझे मोटार सायकलने हनुमान मंदिर कोठुर फाटा, निफाड येथे सापळा पथक थांबले ठिकाणी परत आलो. पो.हवा पळशिकर यांनी माझेकडील व्हाईस रेकॉर्डर घेवून ते 17/42 वाजेच्या सुमारास बंद केले. त्यानंतर मी पोलीस निरीक्षक आदमाने मॅडम यांना व सापळा पथकास घडलेली हकिगत सांगितली. त्यानंतर पोनि आदमाने मॅडम यांनी व्हाईस रेकॉर्डर चालु करुन त्यातील संभाषण ऐकुण लाच मागणी बाबत खात्री झाल्यानंतर लाचेची रक्कम मला उपलब्ध करुन देणे बाबत सांगितले असता मी त्यांना माझेकडे सध्या लाचेची रक्कम नसुन उदईक रोजी 50,000/- रुपये उपलब्ध करुन देतो बाबत सांगितल्याने पुढील सापळा कारवाई दिनांक 07/03/2025 रोजी करण्याचे सर्वानुमते ठरले.

ठरविल्या प्रमाणे दिनांक 07/03/2025 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नाशिक कडील पोलीस निरीक्षक श्रीमती आदमाने मॅडम व त्यांचे पथक असे हनुमान मंदिर कोठुर फाटा, निफाड येथे आले असता मी त्यांची भेट घेवून माझेकडे असलेले 500/- रू. दराच्या 100 चलनी नोटा असे एकुण 50,000/- रुपये त्यांच्या ताब्यात दिले

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| | | | दराच्या 100 चलनी नोटा असे 50,000/ रुपये व 3,00,000/ रुपयांच्या डमी कर | |

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

350,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

निफाड पोलीस ठाणे,नाशिक ग्रामीण फिर्याद

माझे नाव श्री. सचिन सुकदेव कुयटे, वय 36 वर्षे व्यवसाय:-शेती, रा. मु. पो. दावचवाडी, ता. निफाड, जि.नाशिक
दिनांक 08/03/2025
ह. मु. कोणार्क नगर, आडगांव शिवार, नाशिक मो.क्र.9370342014
मी वरिल नमुद पत्यावर कुटुंबासह रहात असुन शेती करुन कुटूंबाचा उदरनिर्वाह करतो. माझी मावशी नामे सुमन
अशोक चौधरी, रा. मु. पो. दिक्षी ता. निफाड, जि. नाशिक हि विधवा असुन तिला मुलगा नाही. तसेच ती अशिक्षीत
आहे. त्यामुळे तिचे शासकीय कार्यालयात काही कामकाज असल्यास ते मीच पहात असतो.
माझी मावशी हिची मौजे दिक्षी ता. निफाड येथे गट नं. 305 येथे 45 गुंठे शेत जमीन आहे. सदरच्या शेत
जमीनीस लागुनच गट नं. 304 आहे. सदरच्या दोन्ही गटामध्ये पावसाचे पाणी जाण्यासाठी पुर्वी पासुन ओव्हळ
होता. परंतु सदरचा ओव्हळ बुजून तेथे वहिवाट तयार झाली आहे. त्यामुळे मावशीच्या शेतात पावसाचे पाणी जावून
शेत मालाचे मोठया प्रमाणात नुकसान होत असते. त्यामुळे सदर शेत जमीनीची मोजणी करण्यासाठी दिनांक
25/11/2024 रोजी भुमी अभिलेख कार्यालय, निफाड यांचे नावे माझ्या मावशीने लेखी अर्ज केला होता. मी
सदरचा अर्ज घेवुन भुमी अभिलेख कार्यालयात गेलो होतो.तेव्हा सदर कार्यालयातील शिपाई श्री. गाढे यांचेशी माझी
भेट झाली व आमच्या दोघाचा परिचय झाला होता. त्यांनी सदरचा अर्ज घेवून ऑनलाईन अर्ज भरण्याची प्रक्रीया
केली त्याकरीता स्टेट बॅक ऑफ इंडिया निफाड येथे मी अती तातडी मोजणीचे 3000/- रुपयांचे चलन भरले होते.
त्यानंतर मी शिपाई श्री. गाढे यांना माझे काम कधी होईल या बाबत विचारणा केली असता ते मला म्हणाले की, मी
तुमचे काम वरिष्ठांकडून करून देतो पण यासाठी तुम्हाला खर्च करावा लागेल. अशी कामे फुकट होत नाहीत.
त्यानंतर जेव्हा जेव्हा मी मावशीच्या कामाचा पाठपुरावा करणे कामी भुमी अभिलेख कार्यालयात जायचो त्या त्या वेळी
माझी शिपाई श्री. गाढे यांचेशी भेट होत असे.व ते नेहमी मला मी तुमचे काम वरिष्ठांकडून करून देतो पण खर्च करावा
लागेल असे म्हणायचे.
मी वारंवार भुमीअभिलेख कार्यालयात जावुन कामाचा पाठपुरावा केला असता दिनांक 22/01/2025 रोजी
मावशिच्या शेतीची भुमीअभिलेख कार्यालयामार्फत मोजणी करण्यात आली होती.सदरची मोजणी हि शैलेशसिंह
राजपुत यांनी केली होती. त्यावेळी मी तेथे उपस्थित होतो. सदरवेळी मावशीच्या शेतीची फक्त मोजणी करण्यात
आली. परंतु हद्दीखुणा दाखविल्या नाही.त्यानंतर मी पुन्हा कार्यालयात जावुन पाठपुरावा केला असता दिनांक
28/02/2025 रोजी भुमी अभिलेख कार्यालया मार्फत हद्दीखुणा दाखविण्या करीता दिनांक 07/03/2025 रोजी
हजर रहाणे बाबत मावशीच्या नावाने नोटीस देण्यात आली.
त्यानंतर दिनांक 02/03/2025 व दिनांक 03/03/2025 रोजी मला भुमी अभिलेख कार्यालय निफाड येथील
शिपाई श्री. गाढे यांनी त्यांचा मोबाईल क्रमांक 9823769968 वरुन माझ्या मोबाईलवर कॉल करुन मला त्यांच्या
कार्यालयात भेटीसाठी बोलाविले. त्यांच्या बोलाविले वरुन मी दिनांक 03/03/2025 रोजी दुपारी भुमी अभिलेख
कार्यालय, निफाड येथे जावुन शिपाई गाढे यांची भेट घेतली असतात्यांनी मला मावशिच्या मौजे दिक्षी येथील गट नं.

व त्यांनी उपलब्ध केलेले 300000/-रुपये टॉय करन्सी असे एकुण 3,50,000/- रुपयांच्या नोटांना पोलीस निरीक्षक श्रीमती आदमाने मॅडम यांनी दिलेल्या सुचनां प्रमाणे सापळा पथकातील पोहवा/पळशिकर यांनी सापळा पथकाचे साहीत्य साधनातुन अँन्थ्रासीन पावडर काढुन त्याचे प्रात्यक्षिक करून दाखवुन सदर पावडर मी दिलेल्या चलनी नोटा व टॉय करन्सीला लावली व त्या नोटा माझे पॅन्टचे पुढील उजव्या खिशात ठेवुन दिल्या. त्यानंतर पोहवा/पळशिकर यांनी व्हाईस रेकॉर्डर 13/51 वाजेच्या सुमारास चालु करून देवुन मला, माझे दाजी श्री. झोमण पंच क्र.1 श्री. पवार यांचेसह  लोकसेवक शिपाई श्री. गांढे यांचे भेटीसाठी आवश्यक त्या सुचना देवुन माझ्या कारने रवाना केले. त्याप्रमाणे मी, माझे दाजी श्री. झोमण व पंच श्री. पवार असे आम्ही लोकसेवक शिपाई श्री.गाढे यांचे भेटीसाठी भुमी अभिलेख कार्यालयाचे समोर पोहचलो. आमचे पाठोपाठ पोलीस निरीक्षक श्रीमती आदमाने मॅडम व सापळा पथक तसे पंच नं. 2 असे शासकीय वाहनाने येवून सदर परीसरात गोपनीयरीत्या सापळा आयोजित केला. काही वेळातच लोकसेवक श्री. गाढे हे माझे कारमध्ये येवून बसले व माझेकडून 3,50,000/- रुपये लाचेची रक्कम स्विकारली असता मी ठरल्या प्रमाणे माझे कारचे पार्कींग लाईट चालु करुन लाच स्विकारल्याचा इशारा केला असता सदरचा इशारा पाहुन सापळा पथकाने त्यांना 14/04 वाजेच्या सुमारास रंगेहाथ ताब्यात घेवून पो.हवा पळशिकर यांनी माझेकडील व्हाईस रेकॉर्डर बंद केले. त्यावेळी श्रीमती आदमाने मॅडम यांनी लोकसेवक शिपाई श्री. गाढे यांना त्यांची व सापळा पथकाची ओळख करून देवुन त्यांचे नाव विचारले असता त्यांनी त्यांचे नावे नितेंद्र काशिनाथ गाढे वय 35 वर्शे, शिपाई भुमी अभिलेख कार्यालय, निफाड ता. निफाड, जि. नाशिक रा. हनुमान नगर, जुन्या सप्तश्रृंगी मंदिरा समोर, निफाड, ता. निफाड, जि. नाशिक असे सांगितले.

तरी माझी मावशी सुमन अशोक चौधरी हिचे मौजे दिक्षी तालुका निफाड येथील शेत  जमीन गट नं. 305 च्या हद्दीखुणा दाखवून नकाशाचे सिट काढून काम पुर्ण करुन देण्याचे मोबदल्यात लोकसेवक शिपाई गाढे नेमणुक, उप अधीक्षक भुमी अभिलेख कार्यालय, निफाड यांनी उप अधीक्षक भुमी अभिलेख यांच्या ओळखीचा माझ्यावर प्रभाव पाडून त्यांचे नावे स्वतःसाठी दिनांक 06/03/2025 रोजी पंचासमक्ष 4,00,000/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती 3,50,000/- रुपये लाचेची मागणी केली व दिनांक 07/03/2025 रोजी सदर लाचेची रक्कम पंचासमक्ष स्विकारली म्हणुन माझी त्यांचे विरुध्द कायदेशिर फिर्याद आहे.

वरील संगणकावर टंकलिखीत केलेली फिर्याद मी वाचुन पाहीली ती माझे सांगणे प्रमाणे बरोबर टंकलिखीत केलेली आहे.

ही फिर्याद दिली.

समक्ष

दि.08/03/2025

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

ganesh chandrakant gueav **No.**(क्र.): api

**Rank** (पद): I (Inspector)

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस निरीक्षक
सत्यमेव जयते
निफाड पोलीस ठाणे

पोलीस ठाणे अंमलदार
निफाड. पोलीस स्टेशन

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): ganesh chandrakant
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): api